**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – मनोज प्रल्हाद सोनवलकर

माझे वय – ४२ वर्षे,

व्यवसाय – पोलीस निरिक्षक

रा. – विजयदुर्ग पोलीस स्टेशन ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

**सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती यु.आर.हेरवाडे यांचे मार्फत.**

०१. दि. १४/१२/२०२३ रोजी माझी मालवण पोलीस स्टेशल येथे सहा. पोलीस निरिक्षक पदावरती नेमणूक होती. सदर दिवशी कर्तव्यावर हजर असताना मालवण पोलीस निरिक्षक कोल्हे यांनी मला मसुरे दुरक्षेत्र येथे जाण्यासाठी आदेश दिला. माझ्यासोबत पेडणेकर, घागरे, प्रतिक जाधव व चालक पाटील हे होते. आम्ही १७.३० वा. मालवण पोलीस स्टेशन येथून सरकारी वाहनाने निघालो होतो. आम्ही मसुरे दुरक्षेत्र या ठिकाणी साधारणपणे १७.५० वा. पोहोचलो. सदर ठिकाणी उपविभागीय पोलीस अधिकारी आढाव व पोलीस निरिक्षक कोल्हे, सहाय्यक पोलीस निरिक्षक जाधव, पीएसआय झांजुर्णे व ढोले हजर होते. तसेच त्या ठिकाणी पोलीस उपविभागीय कार्यालयातील कडूलकर, गवाणकर व चालक हजर होते. पोलीस उपविभागीय अधिकारी यांनी कालावल नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा होवून डंपरने वाहतूक होत असल्याने त्यावरती कारवाई करण्याचे आदेश दिले.

०२. त्यानंतर आम्ही सर्वजण कालावल खाडीकडे जाण्यासाठी भगवंतगड आचरा रस्त्याने जात होतो. आम्हाला भगवंतगड ते आचरा या रस्त्यानी एक डंपर क्र. एमएच–०७–सी–५५४५ संशयितरित्या येत असताना दिसला. पीएसआय झांजुर्णे यांनी सदर डंपरला हात करुन थांबण्याचा इशारा केला. सदरचा डंपर न थांबता पुढे गेल्यामुळे आम्ही त्या गाडीचा पाठलाग करुन भटवाडी दुधडेअरी जवळील परिसरामध्ये सदरचा डंपर थांबविला. पीएसआय झांजुर्णे व घागरे यांनी सदर डंपरची तपासणी केली असता त्यामध्ये साधारणपणे ३ ब्रास वाळू मिळून आली. आम्ही सदर डंपर १८.४७ वा. पकडला होता. सदर डंपरच्या चालकास त्याचे

नाव विचारले असता त्याने त्याचे नाव मालोंडकर असे सांगितले. आम्ही डंपर चालकास वाहनाचा व वाळू वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारले असता त्यानी परवाना नसल्याचे सांगितले. आम्ही डंपर चालकाला सदर गाडीचा मालक कोण आहे याबाबत विचारणा केली असता त्याने राजेंद्र पेडणेकर हा गाडीचा मालक असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी सांगितले की, डंपरच्या मालकाच्या सांगण्यावरुन कालावल नदीपात्रातून काढलेल्या वाळूचा साठा केला होता व त्याची वाहतूक केलेली आहे. सदर घटनेबाबत पोलीस कॉन्स्टेबल महादेव घागरे यांनी फिर्याद दिली होती. मला डंपर चालक व डंपरचे मालक दाखविल्यास मी त्यांना ओळखू शकतो. साक्षीदाराने आरोपी क्र. १ समीर यास डंपर चालक व आरोपी क्र. २ राजेंद्र यास डंपर मालक म्हणून ओळखले.

सरतपास पूर्ण

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.यु.बी.कुळकर्णी यांचे मार्फत.</u>**

०३. मला डंपर मिळालेली निश्चित जागा सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कुठलाही डंपर मिळून आला नव्हता. झांजुर्णे यांनी ज्यावेळी डंपरला हात दाखविला होता त्यावेळी मी झांजुर्णे यांच्यासोबत हजर होतो. डंपर साधारणपणे १० ते २० मीटर अंतरावरुन दिसला होता. हे मला सांगता येणार नाही की, आचरा भगवंतगड हा सरळ रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला १० ते २० मीटर अंतरावरुन डंपर दिसला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी झांजुर्णे यांच्यासोबत हजर होतो ही बाब दर्शविण्यासाठी माझ्याकडे माझ्या शब्दाशिवाय पुरावा नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, इतर साक्षीदारांचा पुरावा आहे. मी तपासी अधिकाऱ्याला छाप्याच्यावेळी गेलो होतो ही बाब दर्शविण्यासाठी कुठलाही कागदोपत्री पुरावा दिला नव्हता. घटनास्थळ ते मसुरा दुरक्षेत्र यामध्ये साधारणपणे २० कि.मी. अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला मसुरा दुरक्षेत्र ते घटनास्थळ यातील निश्चित अंतर सांगता येत नाही. डंपरच्या समोर थांबवून डंपरला अडविण्याचा प्रयत्न केला होता. आम्ही थांबलेल्या जागेपासून ५ फूट अंतरावर आमचे वाहन थांबले होते. आमचे वाहन डंपरच्या आडवे घालण्याचा प्रयत्न केला नव्हता.

०४. आम्ही डंपर साधारणपणे अर्धा किलोमिटर अंतरावरती जावून थांबविला होता. डंपर थांबविलेल्या ठिकाणाच्या आजूबाजूला असलेल्या इमारती व घरे कोणाची आहेत हे मला सांगता येणार नाही. आम्ही डंपर थांबविलेल्या ठिकाणावरती दुध डेअरी नावाचा कुठलाही बोर्ड नव्हता. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, डंपर थांबविलेल्या ठिकाणाला दुध डेअरी परिसर म्हणून ओळखला जातो. मी डंपर थांबविलेला ठिकाणाला दुध डेअरी परिसर म्हणून ओळखले जाते ही बाब दर्शविण्यासाठी कुठलाही कागदोपत्री पुरावा देवू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ याच्या मालकीचा कुठलाही डंपर पकडलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, डंपरच्या मालकाच्या सांगण्यावरुन कालावल नदीपात्रातून काढलेल्या वाळूचा साठा केला होता व त्याची वाहतूक केलेली आहे असे डंपर चालकाने सांगितले होते हे मी खोटे सांगत आहे. वाळू साठा केलेल्या ठिकाणाची मी व माझ्या सहकाऱ्यांनी जावून पाहणी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, चुकीच्या माहितीच्या आधारे आरोपींविरुध्द चुकीची कारवाई केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाळूचा डंपर तथाकथित घटनास्थळावरती मिळाला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ वाळू वाहतूक करत होता असे कधीही आम्हाला आढळले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, चुकीच्या माहितीच्या आधारे आरोपींविरुध्द चुकीची कारवाई केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : ११/०३/२०२५

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण